REG.NO. : MAHBIL/2012/54586 UGC Approval No. 63299 ISSN: 2319-5525

# संशोधन चेतना
# SANSHODHAN CHETANA

VOL: 7th, Special ISSUE, ENGLISH-MARATHI, QUARTERLY : 29th Dec. 2018

## Special Issue on
## "Future Nation Builders: Higher Education Institutions"




संपादक डॉ. सुनिता मगरे

## University of Mumbai

Re-accredited with 'A' Grade by NAAC

**One Day International Seminar**

ON

# "FUTURE NATION BUILDERS: HIGHER EDUCATION INSTITUTIONS"

**29th December 2018**

Organised by

Adarsh Shikshan Prasarak Mandal

**Shri Bapusaheb D. D. Vispute College of Education, New Panvel**

NAAC Accredited with 'B' Grade

## (Internal Quality Assurance Cell (IQAC))

In Association with

## Department of Education
## University of Mumbai, Kalina, Mumbai

**We are pleased to invite all Teachers at University/Colleges/Institutions/Schools, Research Scholars and M.Ed. Students to attend the one day international seminar on 29th December 2018.**

**CONVENOR**

| | |
|---|---|
| **Dr. Seema Nivrutti Kamble**<br>Principal,<br>Shri Bapusaheb D. D. Vispute College of Education, New Panvel. | **Dr. Sunita Magre**<br>Professor & Head, Department of Education, University of Mumbai, Mumbai. |

**Seminar Venue:**

Shri Bapusaheb D. D. Vispute College of Education,
Multipurpose Hall, 4th Floor, Adarsh, Plot No. 41, Sector 15, Near Panvel Railway Station, New Panvel.

| | | | |
|---|---|---|---|
| 27 | उच्च शिक्षणातील समावेशक शिक्षणाचा पाया व सदयस्थिती | Ms. Aprna Kamble | 149 to 157 |
| 28 | उच्चशिक्षणामध्ये विविध योजना व त्यामध्ये राज्य व केंद्रशासनाची भुमिका | प्रा. छाया शिवाजी शिरसाट व श्री बापुसाहेब डी.डी. विसपुते | 158 to 165 |
| 29 | "उच्च शिक्षणावर व्यापारीकरण, खाजगीकरण, जागतिकीकरण आणि उदारिकरण यांचा प्रभाव " | डॉ.कुसुम व्ही. चौधरी | 166 to 177 |
| 30 | उच्च शिक्षणात केंद्र व राज्य सरकारची धोरणे व भूमिका | सौ. नेहा नरेंद्र म्हात्रे | 178 to 183 |
| 31 | उच्च शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना सोयी सवलती व शिक्षकाची भूमिका | श्री. प्रशांत गजानन पाटील | 184 to 191 |
| 32 | उच्च शिक्षणाचे : व्यापारीकरण, खाजगीकरण, जागतिकीकरण आणि उदारीकरण. | Ruta Rohan Raul | 192 to 201 |
| 33 | "उच्च शिक्षणातील गुणवत्ता आणि आव्हाने" | सौ. साक्षी सुरेश गोळे | 202 to 212 |
| 34 | जागतिकीकरण आणि जागतिक शिक्षण | श्रीमती बुटले एस.एन. | 213 to 217 |
| 35 | उच्च शिक्षणात मूल्य शिक्षण संदर्भात संबंधित व्यक्तींच्या भुमिका | समीर शंकर म्हात्रे | 218 to 222 |
| 36 | कला शाखेतील एफ.वाय.बी.ए.मध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांना मराठी विषयाचे अध्यापन करताना प्राध्यापकाला येणा-या अडचणींचा अभ्यास | डॉ. भाऊसाहेब सोपान आंधळे | 223 to 233 |
| 37 | 'उच्च शिक्षणाच्या विकासासाठी शालेय स्तरावरील समावेशित शिक्षण" | डॉ. सोनुने एस.एस. | 234 to 242 |
| 38 | उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्याच्या दृष्टीकोनातून विचार | Dr.Dayaram D.Pawar | 243 to 248 |

**प्रस्तावना** : शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तीचा , समाजाचा , व राष्ट्राचा विकास साधता येतो . शिक्षण हे व्यक्तिला घडविण्याचे कार्य करते . ज्ञान आणि सशक्तीकरणाच्या माध्यमातून परिवर्तन घडवून आणण्यासाठी शिक्षण हे एक महत्वपूर्ण साधन होय. एकविसाव्या शतकातील ज्ञानाधिष्ठीत अर्थव्यवस्थेच्या समस्यांना सामोरे जाणारे ज्ञान , अभ्यासक्रम तसेच शिक्षणप्रक्रीयेमध्ये बदल घडवून आणणे गरजेचे आहे. त्यासाठी प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंतचा विचार होणे गरजेचे आहे. केवळ पुस्तकी ज्ञान न देता स्वंयरोजगारावर आधारित कौशल्यपूर्ण ज्ञान देण्यावर भर असला पाहीजे. समाजातील सर्व घटकामध्ये उच्च शिक्षणाचे प्रमाणे वाढविणे , शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे तसेच उच्च शिक्षणाचा दृष्टीकोन विकसीत करणे उच्च शिक्षणातील विद्यापीठ स्तरावरील सद्यस्थितीतील काळाचे आव्हाने आहेत .

**विद्यापीठ स्तरावर मनुष्यबळाची कमतरता**

भारतातील उच्च शिक्षण हा विषय समवर्ती सूचीतील विषय आहे . मनुष्यबळ विकास मंत्रालयाने ठरविलेल्या उच्च शिक्षणाच्या निकष जरी उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासठी आवश्यक असले तरी राज्य विद्यापीठाच्या उच्च शिक्षणाचा दर्जा हा एक प्रश्न आहे. कारण महाराष्ट्रात अनेक विद्यापीठात पुरेशे मनुष्यबळ नाही . त्यामुळे पारंपारिक अभ्यासक्रम व संशोधन कसे बसे राबविले जातात. ह्यात आवडीनूसार पर्याय निवडून श्रेयांक पध्दती , सेमीस्ट पध्दती , सातत्याने मूल्यमापन अभिनव असे आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रम ह्यासारख्या आधुनिक शिक्षणपध्दती राबविणे फार अवघड होते. मुंबई विद्यापीठ , एसएमडीटी विद्यापीठ , डॉ बाबसाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ , कोल्हापूर विद्यापीठ , शिवाजी विद्यापीठ , राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ इत्यादी सर्वच विद्यापीठात कमी जास्त प्रमाणात मनुष्यबळ परिस्थिती सारखीच आढळून येते. राज्यामधील जुन्या विद्यापीठाची ही परीस्थिती असतांना नविन विद्यापीठातील मनुष्यबळाची परिस्थिती तर याहीपेक्षा वेगळी आहे.

कमी मनुष्यबळावर चालणारी विद्यापीठे ही चांगले अध्यापन व संशोधन करु शकतील ह्याची पूर्णपणे हमी देवू शकत नाही. तसेच जर विद्यापीठाला जर रिक्त जागा भरावयाच्या असतील तर राज्य सरकारची परवानगी घ्यावी लागते. अनेकदा परवानगी अभावी कमी मनुष्यबळाच्या समस्येला विद्यापीठांना सामोरे जावे लागते.

### राज्य विद्यापीठांना स्वायत्ता :

राज्यातील विद्यापीठांचे अभ्यासक्रम व संशोधन कार्य करण्यासाठी राज्य विद्यापीठांना उच्च शिक्षणाची फेररचना करणे आवश्यक आहे. केंद्रीय व राष्ट्रीय विद्यापीठाकडे राज्याचा पदव्यूत्तर व सशोधन विभाग देवून केवळ पदवी अभ्यासक्रम राज्य विद्यापीठाकडे दिला पाहीजे .तसेच केंद्रीय विद्यापीठाकडे पदव्यूत्तर व संशोधन ह्यासाठी राज्यविद्यापीठांना मिळणारा निधी पण दिल्यास राज्य विद्यापीठांना त्याच्या धोरणानूसार स्वायत्ता मिळेल. ह्यामुळे राज्य विद्यापीठांना त्यांचा अभ्यासक्रम व श्रेयांक , विद्यार्थी व शिक्षक ह्यांचे आदानप्रदान करता येतील. ह्याचा फायदा म्हणजे आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रम व त्यांचे अध्यापन शक्य होईल.

### विद्यापीठे राजकारणापासून अलिप्त असावी :

उच्च शिक्षणाच्या पारदर्शी कारभारासाठी लोकशाही पध्दत गरजेची आहे हे केवळ राज्यशास्त्र शिकविण्यापुरतेच मर्यादीत राहीलेले आहे. शैक्षणिक क्षेत्राचा विकास घडवून आणण्यासाठी प्रभावी नेतृत्व तसेच प्रामाणिक निष्ठावान प्राध्यापकवृंद गरजेचे आहे. परंतू शैक्षणिक संस्था व विद्यापीठावर आपणच बहूमताने निवडून दिलेले शिक्षणाचे उदबोधक हे शासनाच्या राजकीय प्रभावाखाली निवडले जातात. त्यासाठी खऱ्या अर्थाने जर उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावयाचा असेल तर संस्थाप्रमुखांची निवड ही गुणवत्तेवरच झाली पाहीजे. कायदे ठरविण्याचे स्वातंत्र्य त्यांना दिले पाहीजे. परंतू त्याला संविधानासारखी एक चौकट आखून द्यावी.

## सर्व विद्यापीठाचे , शैक्षणिक संस्थाचे नियम सारखे असावेत :

शिक्षणक्षेत्रातील प्रवेश , मूल्यमापन , दर्जासंबंधीचे तसेच परीक्षेसंबंधीचे नियम सर्व विद्यापीठाचे समान असावे. सद्यपरिस्थितीत पाहिल्यास काही विद्यापीठाचे नियम कडक तर काही मध्ये शिथिलता आहे. काही विद्यापीठाच्या संशोधनाच्या दर्जासंबंधीचे निकष वेगवेगळे असलेले आढळते. परंतू मानांकन करतांना सारखे निकष . ह्याद्वारे होणारे मूल्यमापन हे योग्यच असतील असे सांगता येणार नाही. ह्यासाठी सर्व विद्यापीठाची नियमावली ही सारखी असणे गरजेचे आहे . विद्यापीठ कायदा २०११६ च्या नविन अदयादेशाप्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक आहे.

## भारतातील उच्च शिक्षणाच्या खाजगीकरणावर निर्बंध :

मागील दोन दशकाच शिक्षणाचा परीघ वाढविण्यासाठी झालेल्या प्रयत्नामुळे खाजगीकरणाची मुळे जास्त घट्ट रोवल्या गेली . देशात खाजगी विद्यापीठांना मान्यता , विशिष्ट विषयांचा अभ्यास व संशोधनाकरीता अभिमत विद्यापीठ , संकल्पना , दूरशिक्षणाचे प्रमाण वाढले . ह्या सर्व बाबीमुळे उच्च शिक्षणात खाजगीकरण झाले. खाजगीकरणाद्वारे शिक्षणाचा परीघ वाढवायचा हे जणू उच्च शिक्षणाचे सुत्रच बनले आहे. खाजगीकरणामुळे सर्व सामान्यांच्या आवाक्याबाहेरील फी दरवाढ केल्यामुळे त्यांना शिक्षण परवडण्यासारखे नाही. सर्वत्र शिक्षणाचे बाजारीकरण होत आहे. व्यावसायिक शिक्षण तर खाजगीकरणाच्या ताब्यात आहे. तेथे प्रवेश मिळविण्यासाठी तेथे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेपेक्षा पैशा महत्वाचा ठरत आहे. अशा परीस्थितीत गुणवत्ता व आवड असतांना देखिल विद्यार्थ्यांना माघार घेवून इतर अभ्यासक्रमाची निवड करावी लागते . कौशल्ये असतांनाही खाजगीकरणामुळे विद्यार्थ्यांना उच्चशिक्षण घेता येणे शक्य होत नाही. ह्या खाजगीकरणावर राज्य सरकारकडूनच निर्बंध लावल्या गेले पाहीजे. तरच प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण होतील.

**उच्च शिक्षणावरील खर्च वाढविण्याची गरज :**

कोठारी आयोगाने ५० वर्षापूर्वी राष्ट्राच्या एकुण उत्पनाच्या सहा टक्के रक्कम शिक्षणावर खर्च करण्याची शिफारस केली होती. ती आजही अंमलात आलेली दिसत नाही. आजच्या स्थितीत चार टक्के रक्कम देखिल शिक्षणावर खर्च केली जात नाही. दरवर्षीच्या अर्थसंकल्पात शिक्षणावरी ल खर्चात जेमतेम वाढ केली जाते. परंतू महागाईच्या ह्या काळात व लोकसंख्येच्यादृष्टीने ती वाढ अत्यल्प ठरते. सरकार उच्च शिक्षणासाठी वेगवेगळ्या योजना आखतात. परंतू त्यासाठी लागणाऱ्या अतिरिक्त निधीची तरतूद केल्या जात नाही . एखाद्या घटकावरील खर्च कमी करुन तो दूसऱ्या घटकावर केला जातो. यूजीसी बंद करणे तसेच महाविद्यालयांना स्वायत्ता देण्याच्या या निर्णयाचा ह्याच दृष्टीकोनातून विचार होत आहे की काय असे जाणवते. त्यादृष्टीने नविन उच्च शिक्षणाचा आयोग स्विकारतांना ह्या सर्व बाबींचा विचार व्हावयास हवा. उच्च शिक्षणाचा दर्जा , गुणवत्ता वाढविण्यासाठी सरकारने त्यावरील खर्च योग्य त्या परीने वाढविणे महत्वाचे आहे.

समारोप : भारतात उच्च शिक्षणात सुधार आणण्यासाठी अनेक समीत्या नेमल्या गेल्या . पुनय्या समीती , अंबानी – बिर्ला विशेष अभ्यास गट ह्या समित्यानी उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी अनेक योजना सुधारणा सुचविल्या . ह्या योजनांनीच जर योग्य रितीने अंमलबजावणी केली तरी देखिल खुप काही साधता येईल . तसेच उच्च शिक्षणाचे सर्वकष आधिकार दूरशिक्षण तसेच बहीशाल शिक्षणाला प्रोत्साहान दिल्यास अनेक विद्यार्थ्यांना आपले उच्च शिक्षण पूर्ण करता येईल . व ह्याचा चांगला परिणाम हा उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी उपयोगी होईल.

आजचे यूग हे ज्ञानाचे व माहितीचे युग आहे . ज्या देशाकडे ज्ञानाचा साठा आहे त्याचे जगावर अधिराज्य

असल्याचे दिसून येते . भारताचा विचार केल्यास आजही भारतामध्ये २५ टक्के लोक हे निरक्षर आहेत .केवळ पंधरा टक्केच माध्यमिक शिक्षण पूर्ण करतात व ह्या सर्वांमधील केवळ ७ टक्के उच्च शिक्षणापर्यंत पोहटतात . ह्या आकडेवारीचा विचार केल्य निश्चितही ही सुखावह बाब नाही . उच्च शिक्षणामध्ये भारताला पाहीजे तेवढे यश अजून गाठता आलेली नाही . भारताचा लोकसंख्येच्या दृष्टीने जगात दुसरा क्रमांत लागते . उच्च शिक्षणामध्ये देखिल भारतीय उच्च शिक्षण व्यवस्थी ही तिसऱ्या स्थानावर आहे . भारतातील लोकसंख्या व शिक्षणाचा आलेखाचा विचार केल्यास येणाऱ्या वर्षामध्ये भारत उच्च शिक्षणात सर्वात जास्त विद्यार्थीसंख्या असेलला देश असेल . प्राथमिक शिक्षण हे सरकारी आहे . मात्र उच्च शिक्षणामध्ये साठ टक्के खाजगीकरणा आहे . भारतामध्ये विद्यापीठाचा विकास स्वातंत्र्य काळानंतर वाढलेला दिसतो. १९७० -७१ मध्ये १०३ विद्यापीठाची संख्या होती . १०८० ते ८१ मध्ये १३३ , १९९०-९१ मध्ये १९० , २००० ते २००१ मध्ये २५६ , २००६ ते २००७ मध्ये ३८७ व २०१० ते २०११ मध्ये ६५९ विद्यापीठ भारतामध्ये अस्तिवात आली (Source - Higher Education in India : Twelve Five Year Plan 2012-2017) परंतू आजही जागतिक विद्यापीठाच्या क्रमांकामध्ये उच्च शिक्षण खूप मागे आहे असेच म्हणावे लागेल. केवळ बोटावर मोजण्याइतक्याच संस्थांना त्यामध्ये स्थान मिळाले आहे.

## संदर्भग्रंथ सूची


1. जोशी म , कळलावे म. (2008) , शिक्षणातील नवप्रवाह, नांदेड : आदित्य पब्लिकेशन.
2. पाटील कृष्णा व चित्रकार राहूल (2009),शिक्षणशास्त्र सेट मी होणारच,कोल्हापूर,फडके पब्लिकेशन.
3. सांगोलकर अरूण(२०११)नवीन जागतीक समाजातील शिक्षणाचे विचारप्रवाह,नाशिक ,इनसाईड पब्लि.
4. Kallave M & Baviskar C, Shinde J(Edi) (2012), Higher Education : Challenges and security (Edi) : Abhang prakashan Nanded.
5. Sava Sadan college of education (Oct 2011)Emerging Opportunities in Future Higher Education , Conference preceding : Panvel
6. Www. Higher Education in India : Twelve Five Year Plan 2012-2017
7. https://www.google.com / higher education in india
8. http://www.unipune.ac.in/Maha_Public_Uni_Act/pdf/Maharashtra%20Public%20Universities%20Act%202016%20English%20Copy.pdf

३८

# उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्याच्या दृष्टीकोनातून विचार

Dr.Dayaram D.Pawar,
School of Education,
Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik

**Abstract:**

Indian Higher Education System is the third largest in the World. The education has power to make change in the society. The higher education is the powerful tool of 21st century to build a knowledge – based information society. But presently this higher education system has many issues of concern like finance, less human resource, Interference of Political in higher education etc. The scope of higher education is increasing day by day and the demand can only fulfill by the quality education. Today the percentage of youth taking higher education is 25 percent of the total population. And the remaining 75 percent youth are learning till to the primary or secondary education. The inclusion of privatization increasing less impact on the quality education. Privatization structure increase inequality in higher education. There are some issues are in the higher education privatization, less investment on education by government etc. This paper will focus on such issues which are the obstacle in the improvement of quality education in higher education.

**Key Word:** Higher Education, population. , knowledge – based information society, quality education. privatization